# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** प्रभाग क्र. १६ पुर्व व पश्चिम लक्ष्मीनगर येथे रस्त्याचे सिमेंटीकरण
**{सा.बां.वि. झोन क्र. १}** करण्याबाबत रु. ६,२२,९५,२३४/- (रु. सहा कोटी बावीस लक्ष पंच्याण्णव हजार दोनशे चौतीस फक्त) रकमेचे प्राकलन पद क्र. A२०२००४२२०२२ अंतर्गत विभागाद्वारे तयार केलेले आहे. सदर्हू रु.६,२२,९५,२३४/- रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निविदा मागवून हाती घेण्याचा तसेच पद क्र. A२०२००४२२०२२ अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

**टिप :-**

१. प्रस्तावित काम हे पद क्र. A२०२००४२२०२२ अंतर्गत प्रस्तावित असुन सदर्हू कामास सन २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात, सदर्हू पदा अंतर्गत राशी रु. ६,२२,९५,२३४/- चे प्रावधान प्राप्त आहे.
२. या कामास मा. मुख्य अभियंता यांनी SE/PWD/T.S./१८५/२०२३-२४दिनांक ०२/०८/२०२३ अन्वये तांत्रीक मान्यता प्रदान केलेली आहे.
३. सविस्तर टिप्पणी नस्तीत आहे.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 498/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 22/08/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, लक्ष्मीनगर झोन क्र. १ यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार प्रभाग क्र. १६ पुर्व व पश्चिम लक्ष्मीनगर येथे रस्त्याचे सिमेंटीकरण करण्याबाबत रु. ६,२२,९५,२३४/- (रु. सहा कोटी बावीस लक्ष पंच्याण्णव हजार दोनशे चौतीस फक्त) रकमेचे प्राकलन पद क्र. A२०२००४२२०२२ अंतर्गत विभागाद्वारे तयार केलेले आहे. सदर्हू रु.६,२२,९५,२३४/- रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा तसेच हे काम निविदा मागवून हाती घेण्याचा तसेच पद क्र. A२०२००४२२०२२ अंतर्गत तरतुद मुक्त करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**